**नवी मुंबई महानगरपालिका**

**मा.प्रशासक तथा आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका**

**गुरुवार, दिनांक ०७ जानेवारी २०२१ रोजी भरलेल्या सभेतील मंजुर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे:-**

| | |
|---|---|
| विषय क्र.०१.<br>दि. ०७ जानेवारी, २०२१ | कोरोना विषाणू साथीच्या अनुषंगीक VTM KIT, १ Tube of Viral Transport Media with २ Swabs (५० Test Kit) खरेदी निविदेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या न्यूनतम दरांना मान्यता मिळणेबाबत, आयुक्तांचे दिनांक ०७/०१/२०२१, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/आरोग्य/५१२/२०२१. |
| ठराव क्र.४९१ | "उपरोक्त संदर्भात कोरोना विषाणू साथीच्या अनुषंगीक VTM KIT, १ Tube of Viral Transport Media with २ Swabs (५० Test Kit) खरेदी निविदेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या न्यूनतम दरांना मान्यता मिळणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे कोव्हीड संशयीत रुग्णांची तपासणी करीता आवश्यक VTM KIT, १ Tube of Viral Transport Media with २ Swabs, शासनामार्फत पुरवठा न झाल्यास आवश्यकतेनुसार खरेदी करणेस रक्कम रुपये ४९,८३५५२/- (अक्षरी रुपये एकोणपन्नास लक्ष त्र्याऐंशी हजार पाचशे बावन्न मात्र) एवढ्या खर्चास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(क) अन्वये मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात यावी.” |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>कोरोना विषाणू साथीच्या अनुषंगीक VTM KIT, १ Tube of Viral Transport Media with २ Swabs (५० Test Kit) खरेदी निविदेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या न्यूनतम दरांना मान्यता मिळणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक ४९१, प्रस्तावित केल्याप्रमाणे कोव्हीड संशयीत रुग्णांची तपासणी करीता आवश्यक VTM KIT, १ Tube of Viral Transport Media with २ Swabs, शासनामार्फत पुरवठा न झाल्यास आवश्यकतेनुसार खरेदी करणेस रक्कम रुपये ४९,८३५५२/- (अक्षरी रुपये एकोणपन्नास लक्ष त्र्याऐंशी हजार पाचशे बावन्न मात्र) एवढ्या खर्चास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(क) अन्वये मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे. |

**सही/-**
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

**सही/-**
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| विषय क्र.०२. दि. ०७ जानेवारी, २०२१ | कोरोना विषाणू साथीच्या अनुषंगीक RT PCR प्रयोगशाळेकरीता किट्स व कन्झ्युमेबल्स खरेदी निविदेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या न्यूनतम दरांना मान्यता मिळणेबाबत, आयुक्तांचे दिनांक ०७/०१/२०२१, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/आरोग्य/५१३/२०२१. |
| ठराव क्र.४९२ | "उपरोक्त संदर्भात कोरोना विषाणू साथीच्या अनुषंगीक RT PCR प्रयोगशाळेकरीता किट्स व कन्झ्युमेबल्स खरेदी निविदेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या न्यूनतम दरांना मान्यता मिळणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे RT PCR टेस्ट करीता किट व्यतिरिक्त लागणारे कंझ्युमेबल व प्लास्टीकवेअर या बाबी व शासनामार्फत पुरवठा न झाल्यास आवश्यकतेनुसार किट्स व कंझ्युमेबल्सची खरेदी करीता मे. श्रृतिका ट्रेडींग कंपनी या निविदाकारांकडून नमुद दराने नमुद प्रमाणात खरेदी करणेकामी **एक रकमी आदेश न देता टप्प्या-टप्प्याने पुरवठा आदेश द्यावा आणि प्रत्येक वेळी बाजारभावाबद्दल खात्री करणे या सुधारणेसह** रक्कम रुपये ४,६४,१०,६६४/- (अक्षरी रुपये चार कोटी चौसष्ट लक्ष दहा हजार सहाशे चौषष्ट मात्र) एवढ्या खर्चास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(क) अन्वये मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात यावी." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>कोरोना विषाणू साथीच्या अनुषंगीक RT PCR प्रयोगशाळेकरीता किट्स व कन्झ्युमेबल्स खरेदी निविदेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या न्यूनतम दरांना मान्यता मिळणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०२ ठराव क्रमांक ४९२, प्रस्तावित केल्याप्रमाणे RT PCR टेस्ट करीता किट व्यतिरिक्त लागणारे कंझ्युमेबल व प्लास्टीकवेअर या बाबी व शासनामार्फत पुरवठा न झाल्यास आवश्यकतेनुसार किट्स व कंझ्युमेबल्सची खरेदी करीता मे. श्रृतिका ट्रेडींग कंपनी या निविदाकारांकडून नमुद दराने नमुद प्रमाणात खरेदी करणेकामी **एक रकमी आदेश न देता टप्प्या-टप्प्याने पुरवठा आदेश द्यावा आणि प्रत्येक वेळी बाजारभावाबद्दल खात्री करणे या सुधारणेसह** रक्कम रुपये ४,६४,१०,६६४/- (अक्षरी रुपये चार कोटी चौसष्ट लक्ष दहा हजार सहाशे चौषष्ट मात्र) एवढ्या खर्चास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(क) अन्वये मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे. |

**सही/-**
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

**सही/-**
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| **विषय क्र.०३. दि. ०७ जानेवारी, २०२१** | **नवी मुंबई महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना २०१८-२०३८ शासनाने दि. ०२/१२/२०२० च्या अधिसूचनेद्वारे मंजूर केलेली "एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली" नवी मुंबई महानगरपालिकेस लागू करणेबाबत, आयुक्तांचे दिनांक ०७/०१/२०२१, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/नरवि/ससंनर/६६/२०२१.** |
| **ठराव क्र.३९३** | **"उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना २०१८-२०३८ शासनाने दि. ०२/१२/२०२० च्या अधिसूचनेद्वारे मंजूर केलेली "एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली" नवी मुंबई महानगरपालिकेस लागू करणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे** नवी मुंबई महानगरपालिकेची स्थापना दि.०१/०१/१९९२ पासून झालेली असून या महानगरपालिका क्षेत्रासाठी सिडकोची तत्कालीन विकास योजना, जी शासनाने दि.१८/०८/१९७९ व दि.१८/०१/१९८० रोजी मंजूर करुन दि.०१/०३/१९८० पासून अंमलात आलेली आहे, ती लागू आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उक्त विकास योजनेतील २९ महसूली गावे व या विकास योजनेत समाविष्ट नसलेले केवळ अडवली-भुतावली हे एकमेव महसूली गाव असे एकूण ३० महसूली गावे समाविष्ट आहे.<br>०२. नवी मुंबई महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना **(यापुढे ज्याचा उल्लेख "सदर विकास योजना" असा केलेला आहे)** ही प्रारुप विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावलीसह **(यापुढे ज्याचा उल्लेख "उकत प्रारुप नियमावली" असा करण्यात येईल.)** महानगरपालिकेने तयार करुन दि. १३/१२/२०१९ च्या ठरावान्वये काही बदलांसह मंजूर केलेली आहे व सदर विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे **(यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केलेला आहे)** कलम २६(१) अन्वये जनतेकडून सूचना/हरकती मागविणेसाठी प्रसिध्द करण्याची अनुमती प्रदान केलेली होती. सदर ठरावान्वये सदर (विकास योजना तसेच त्यासोबतच्या उक्त प्रारुप नियमावलीमध्ये १६ असे एकूण २४२) उक्त अधिनियमातील कलम १४८-अे व कलम २६(१) मधील तरतूद विचारात घेता सदर विकास योजना (उक्त प्रारुप नियमावलीसह ) जनतेकडून सूचना/हरकती मागविणेसाठी प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीसाठी एक वर्षाच्या मुदतवाढीचा प्रस्ताव महानगरपालिकेने दि. ०१/१२/२०२० च्या पत्रान्वये संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर केलेला आहे. सदर प्रस्तावानुसार दि. १८/१२/२०२१ पर्यंत मुदतवाढ अपेक्षिलेली आहे.<br>०३. शासनाने दि. ०२/१२/२०२० च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रासाठी आणि प्रादेशिक योजना क्षेत्रासाठी "एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली" मंजूर केलेली आहे. **(यापुढे ज्याचा उल्लेख "सदर नियमावली "असा करण्यात येईल.)** सदर नियमावली ही नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी देखील लागू आहे आणि सदर नियमावली ही दि. ०३/१२/२०२० पासून अंमलात आलेली आहे. सदर नियमावलीतील नियम क्र. १.२ ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.<br>**१.२ Commencement of Regulations :-**<br>**"These regulation shall come into force with from the date of publication of notification in the official Gazette. All the Development Control Regulations/Special Regulations which are in operation shall cease to operate**<br><br>वरील तरतूद स्वयंस्पष्ट असल्याने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी देखील सदर नियमावली दि. ०३/१२/२०२० पासून लागू असून यापुर्वीची नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असलेली "विकास नियंत्रण नियमावली-१९९४ (प्रसिध्द दि. २३/०७/२००८)" ही आपोआप रद्द (Ceased) झालेली आहे. त्यामुळे यापुढील सर्व प्रस्तावांना अर्थात दि. ०३/१२/२०२० पासून सदर नियमावलीनुसार छाननी करुन पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.<br>सदर नियमावलीत वर नमूद केलेली नियम क्र. १.२ ची तरतूद पाहता या पूर्वीची विकास नियंत्रण नियमावली -१९९४ आपोआप रद्द झालेली आहे. तसेच त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने सदर विकास योजनेच्या अनुषंगाने तयार केलेली उक्त प्रारुप नियमावली देखील आपोआप रद्द (Ceased) ठरते. त्यामुळे सदर उक्त प्रारुप नियमावलीबाबत पुढील वैधानिक कार्यवाही करण्याची आवश्यकता राहिलेली नाही. तर केवळ सदर विकास योजना प्रसिध्द करणे योग्य ठरेल, ही बाब विचारात घेता खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात येत आहे.<br>**-: ठराव :-**<br>१. शासनाने दि. ०२/१२/२०२० च्या अधिसूचनेद्वारे मंजूर केलेली व दि. ०३/१२/२०२० पासून अंमलात आलेली "एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली" (Unified Development control and Promotion Regulations-UDCPR) ही, यापूर्वीची "नवी मुंबई महानगरपालिकेची विकास नियंत्रण नियमावली-१९९४ (Development Control Regulation for Navi Mumbai Municipal Corporation-DCR)" रद्द ठरवून (Ceased), दि. ०३/१२/२०२० पासून लागू करण्यात येत आहे व त्यानुसारच नगर रचना विभागाने पुढील कार्यवाही करावी.<br>२. सदर नियमावली दि. ०३/१२/२०२० पासून लागू झाल्याने उक्त नियमावलीतील नियम क्र. १.२ नुसार नवी मुंबई महानगरपालिकेस लागू असलेली नियमावली रद्द (Ceased) झाल्याने सदर विकास योजनेसोबत तयार केलेली "उक्त प्रारुप नियमावली" देखील रद्द (Ceased) ठरत आहे व त्यावर स्वतंत्र कार्यवाही करण्याची आवश्यकता राहिलेली नसल्याने उक्त प्रारुप नियमावली ही उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करणे आवश्यक नाही व त्यानुसार नगर रचना विभागाने पुढील कार्यवाही करावी, सदर विकास योजनेसाठी सदर नियमावलीच लागू राहील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. प्रशासक यांची मंजूरी देण्यात यावी." |

ठराव करण्यात येतो की,

**नवी मुंबई महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना २०१८-२०३८ शासनाने दि. ०२/१२/२०२० च्या अधिसूचनेद्वारे मंजूर केलेली "एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली" नवी मुंबई महानगरपालिकेस लागू करणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.**

**त्यानुसार विषय क्रमांक ०३ ठराव क्रमांक ३९३, प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रस्तावित केल्याप्रमाणे**
नवी मुंबई महानगरपालिकेची स्थापना दि.०१/०१/१९९२ पासून झालेली असून या महानगरपालिका क्षेत्रासाठी सिडकोची तत्कालीन विकास योजना, जी शासनाने दि.१८/०८/१९७९ व दि.१८/०१/१९८० रोजी मंजूर करुन दि.०१/०३/१९८० पासून अंमलात आलेली आहे, ती लागू आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उक्त विकास योजनेतील २९ महसूली गावे व या विकास योजनेत समाविष्ट नसलेले केवळ अडवली-भुतावली हे एकमेव महसूली गाव असे एकूण ३० महसूली गावे समाविष्ट आहे.

०२. नवी मुंबई महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना **(यापुढे ज्याचा उल्लेख "सदर विकास योजना" असा केलेला आहे)** ही प्रारुप विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावलीसह **(यापुढे ज्याचा उल्लेख "उकत प्रारुप नियमावली" असा करण्यात येईल.)** महानगरपालिकेने तयार करुन दि. १३/१२/२०१९ च्या ठरावान्वये काही बदलांसह मंजूर केलेली आहे व सदर विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे **(यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केलेला आहे)** कलम २६(१) अन्वये जनतेकडून सूचना/हरकती मागविणेसाठी प्रसिध्द करण्याची अनुमती प्रदान केलेली होती. सदर ठरावान्वये सदर (विकास योजना तसेच त्यासोबतच्या उक्त प्रारुप नियमावलीमध्ये १६ असे एकूण २४२) उक्त अधिनियमातील कलम १४८-अे व कलम २६(१) मधील तरतूद विचारात घेता सदर विकास योजना (उक्त प्रारुप नियमावलीसह ) जनतेकडून सूचना/हरकती मागविणेसाठी प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीसाठी एक वर्षाच्या मुदतवाढीचा प्रस्ताव महानगरपालिकेने दि. ०१/१२/२०२० च्या पत्रान्वये संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर केलेला आहे. सदर प्रस्तावानुसार दि. १८/१२/२०२१ पर्यंत मुदतवाढ अपेक्षिलेली आहे.

०३. शासनाने दि. ०२/१२/२०२० च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रासाठी आणि प्रादेशिक योजना क्षेत्रासाठी "एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली" मंजूर केलेली आहे. **(यापुढे ज्याचा उल्लेख "सदर नियमावली "असा करण्यात येईल.)** सदर नियमावली ही नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी देखील लागू आहे आणि सदर नियमावली ही दि. ०३/१२/२०२० पासून अंमलात आलेली आहे. सदर नियमावलीतील नियम क्र. १.२ ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

निर्णय :

**१.२ Commencement of Regulations :-**

**"These regulation shall come into force with from the date of publication of notification in the official Gazette. All the Development Control Regulations/<u>Special Regulations which are in operation shall cease to operate</u>**

वरील तरतूद स्वयंस्पष्ट असल्याने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी देखील सदर नियमावली दि. ०३/१२/२०२० पासून लागू असून यापुर्वीची नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असलेली "विकास नियंत्रण नियमावली-१९९४ (प्रसिध्द दि. २३/०७/२००८)" ही आपोआप रद्द (Ceased) झालेली आहे. त्यामुळे यापुढील सर्व प्रस्तावांना अर्थात दि. ०३/१२/२०२० पासून सदर नियमावलीनुसार छाननी करुन पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सदर नियमावलीत वर नमूद केलेली नियम क्र. १.२ ची तरतूद पाहता या पूर्वीची विकास नियंत्रण नियमावली -१९९४ आपोआप रद्द झालेली आहे. तसेच त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने सदर विकास योजनेच्या अनुषंगाने तयार केलेली उक्त प्रारुप नियमावली देखील आपोआप रद्द (Ceased) ठरते. त्यामुळे सदर उक्त प्रारुप नियमावलीबाबत पुढील वैधानिक कार्यवाही करण्याची आवश्यकता राहिलेली नाही. तर केवळ सदर विकास योजना प्रसिध्द करणे योग्य ठरेल, ही बाब विचारात घेता खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात येत आहे.

## -: ठराव :-

१. शासनाने दि. ०२/१२/२०२० च्या अधिसूचनेद्वारे मंजूर केलेली व दि. ०३/१२/२०२० पासून अंमलात आलेली "एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली" (Unified Development control and Promotion Regulations-UDCPR) ही, यापूर्वीची "नवी मुंबई महानगरपालिकेची विकास नियंत्रण नियमावली-१९९४ (Development Control Regulation for Navi Mumbai Municipal Corporation-DCR)" रद्द ठरवून (Ceased), दि. ०३/१२/२०२० पासून लागू करण्यात येत आहे व त्यानुसारच नगर रचना विभागाने पुढील कार्यवाही करावी.

२. सदर नियमावली दि. ०३/१२/२०२० पासून लागू झाल्याने उक्त नियमावलीतील नियम क्र. १.२ नुसार नवी मुंबई महानगरपालिकेस लागू असलेली नियमावली रद्द (Ceased) झाल्याने सदर विकास योजनेसोबत तयार केलेली "उक्त प्रारुप नियमावली" देखील रद्द (Ceased) ठरत आहे व त्यावर स्वतंत्र कार्यवाही करण्याची आवश्यकता राहिलेली नसल्याने उक्त प्रारुप नियमावली ही उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करणे आवश्यक नाही व त्यानुसार नगर रचना विभागाने पुढील कार्यवाही करावी, सदर विकास योजनेसाठी सदर नियमावलीच लागू राहील. प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. प्रशासक यांची मंजूरी देण्यात येत आहे.

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**नगरसचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**सही/-**
**(अभिजीत बांगर)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नवी मुंबई महानगरपालिका**